# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 01/03/2023 (गुरूवार) दुपार

---

## घरफोडी च्या गुन्हयातील आरोपी गजाआड
## पोलीस स्टेशन खापरखेडा यांची कारवाई

पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दिनांक १७/१०/२०२२ रोजी फिर्यादी नामे— सौ. अंजु रमेश तागडे, वय ५० वर्ष रा. वानखेडे ले आउट प्लॉट क्र. २३, पंचशील भवन मागे चनकापुर ता. सावनेर यांनी रीपोर्ट दिली की, यातील फिर्यादी व फिर्यादीचे पति राहते घराला कुलुप लावुन नौकरीवर गेले असता यातील नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीने घराचे लोखंडी गोदरेज कपाटाचे लॉकअप मध्ये ठेवलेले १) नगदी ३८०००/—रू. २) कानातले सोन्याचे बिरे ०३ ग्रॅम किंमती अंदाजे ४५००/—रू. ३. ०१ सोन्याचे मंगळसुत्र ३.५ ग्रॅम व सोन्याचे पदक व ८० सोन्याचे मणी वनज अंदाजे ७.५ ग्रॅम किंमती ११,२५०/—रू. ४) ०२ तोळयाची सोन्याची गाठ ज्यात १.५ ग्रॅमचे ०२ डोरले व ०१ ग्रॅमचे ३० सोन्याचे मणी वजन अंदाजे ४ ग्रॅम किंमती अंदाजे ६०००/—रू. ५. ०१ सोन्याचे मंगळसुत्र ज्यात ०३ ग्रॅम सोन्याचे पदक ६० मणी वजन अंदाजे ०५ ग्रॅम किंमती अंदाजे ७५००/—रू. ६. ०६ सोन्याचे गहु मणी वनज ०३ ग्रॅम किंमती अंदाजे ४५००/—रू. असा एकुण ७१,७५०/— रूप्याचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने संगनमत करून चोरी करून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रीपोढ वरून पोस्टे ला अप क्र. ५८७/२२ कलम ४५४, ३८०,३४ भादंवि अन्वये दाखल करून तपासात घेतला.

स्दर गुन्हयाचे तपसात तत्पुर्वी ०२ आरोपीतांना दिनांक १४/११/२०२२ रोजी अटक करून त्यांचेकडुन गुन्हयात चोरी गेलेला १. सोन्याचे पदक ३.५ ग्रॅम वजनाचे किंमती अंदाजे ६०००/—.रू. २. नगदी ४९३०/—रू. व गुन्हयात वापरलेली ३. एक्टीवा क्र. एम. एच—४०/सी.एफ—५४५७ किंमती अंदाजे ६०,०००/— ही गुन्हयात जप्त करण्यात आलेली असुन गुन्हयातील उर्वरीत मुद्देमाल हा पाहीजे असलेला आरोपी नामे राहुल कांतीलाल सोनी, वय ३८ वर्ष रा. हंसापुरी भंडारा रोड नागपूर यास विकल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर आरोपीचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही.

दि. २५.०२.२०२३ रोजी मुखबिरव्दारे मिळालेल्या खबरेवरून सदर गुन्हयात पाहीजे असलेला आरोपी नामे— राहुल कांतीला सोनी वय ३८ वर्ष, रा. हंसापुरी भंडारा रोड नागपूर हा गणेशपेठ येथे आपल्या मैत्रिणीकडे येत असल्याची विश्वसनीय माहिती प्राप्त झाल्याने पोस्टे खापरखेडा येथील डीबी पथकाने गणेशपेठ नागपूर येथे सापळा रचुन पाहीजे आरोपी राहुल कांतीला सोनी वय ३८ वर्ष, रा. हंसापुरी भंडारा रोड नागपूर हा तेथे येताच त्यास मोठया शातीरतेने ताब्यात घेण्यात आले. पोस्टे खापरखेडा येथे आणुन त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली. सदर गुन्हयात आरोपीने विकत घेतलेला चोरीचा मुद्देमाल गुन्हयात जप्त करण्यात आला.

सदरची कामगीरी ही मा. विशाल आनंद पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. मुख्तार बागवान, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रविण मुंडे ठाणेदार पोस्टे खापरखेडा, डीबी पथकाचे सपोनि दिपक कॉक्रेटवार, पोलीस नायक शैलेश यादव, प्रमोद भोयर, राजू भोयर, मुकेश वाघाडे यांनी पार पाडली.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर